**स्टालिन**

**( एकांकिका )**

**-- चं. प्र. देशपांडे**



# स्टालिन

**-- चं.प्र.देशपांडे.**

(एक टेबलखुर्ची आणि इतर दोन खुर्च्या. टेबलाजवळच्या खुर्चीवर बसून नरेश काहीतरी लिहितो आहे. नरेश हे एक जीवनशक्तीने सळसळणारे व्यक्तिमत्व. परंतु ही सळसळ शारीरिक हालचालींतूनच व्यक्त व्हावी असे नाही. मधेच क्षण दोन क्षण विचार करतो. पुन्हा लिहायला लागतो. मागून हेमा येते. ती आल्याचे पाहूनही नरेशचे लिहिणे चालूच.)

हेमा: घरात कुणी आलेलं दिसत नाही वाटतं ?

नरेश: एक मिनिट.

हेमा: लोकांना नुसतं टांगत ठेवायची सवयच आहे तुला.( नरेश नुसती थांबायची खूण करतो. ती फणकारून गप्प बसते. नरेशचे लिहून झाल्यावर तो उठतो.)

नरेश: काय आहे, एक छोटंसं पत्रक द्यायचं होतं छापायला. लगेच द्यायचंय. आलोच एक दहा मिनिटांत. ( निघतो.)

हेमा: पण माझं त्याहून महत्त्वाचं काही काम असलं तर ?

नरेश: ( हसून ) तसं काही नसतंय गं. बस जरा. आलोच. ( तिच्या प्रतिक्रियेची वाट न पाहता जातो. ती उभी राहिलेली. चिडते. मग बसते. नंतर उठून टेबलाजवळचं एखादं पुस्तक घेऊन चाळत बसते. हे पुस्तक तिला अजिबात न कळणाऱ्या विषयावरचं किंवा तिला अजिबात इंटरेस्ट न वाटणारं आहे, हे तिच्या चाळण्यातून दिसावं. काही क्षण असे गेल्यावर मंदा येते.)

हेमा: ( मंदाला पाहून ) हाय मंदा -- ये ! बरं झालं, नाहीतर हा नरेश येईपर्यंत नुसती कंटाळयानं घुमसटून गेले असते मी.

मंदा: कुठं गेलाय नरेश ?

हेमा: त्याचं माहितीच आहे तुला. पत्रकं, मीटिंग, हे न् ते ! युवा संघर्ष समितीचा सेक्रेटरी ना तो ! ( मंदा समजूतदार स्मित करते. ) अग, ते ठीक आहे, पण माझ्याशी -- आपलं -- -- आपल्याशी ही बेफिकिरी काय म्हणून ! का जास्त लोकांपेक्षा कमी लोक बिनमहत्त्वाचेच असतात ?

मंदा: असूं दे गं ! ज्याची त्याची इंटरेस्टस् असतात. ज्याला त्याला काही गोष्टींचं महत्त्व वाटतं --

हेमा: पण नरेश मला कधी कधी क्रूर वाटतो. आता आपण दोघी मैत्रिणीच आहोत म्हणून बोलते. तूही त्याची मैत्रीण. मीही त्याची मैत्रीण. आपल्याला त्याचा सहवास आवडतो आणि त्याला आपला आवडतो. पण हे सगळं एवढंच आहे की काय -- हे विचारायचं कधी याला ?

मंदा: विचारायचंच नाही. विश्वास ठेवायचा.

हेमा: अगं पण समज आपण दोघींनी आणि आणखी एखादी कुणी असेल तर तिनंही ठेवला विश्वास याच्यावर तरी शेवटी निवड करावीच लागणार नं त्याला -- बरं,( गुप्त आवाजात ) म्हणजे तूही विश्वास टाकलायस त्याच्यावर ?

मंदा: माझा विश्वास आहेच.

हेमा: स्टालिननं पॉलिट ब्यूरोतल्या लोकांना ठार केलं हे चांगलं झालं का ?

मंदा: कधीची गोष्ट ही ?

हेमा: कधीचीही असूं दे. एक मिनिट हे एक वर्षापेक्षा महत्त्वाचं असतं का ? दहा वर्षं ही शंभर वर्षांपेक्षा महत्त्वाची असतात का ?

मंदा: अगं तसं नाही, पण काळाच्या ओघात नव्या घटना घडतात, जुनं बरंच काही वाहून जातं, जुन्या घटनांचे व्रण -- जखमा असलेली माणसं मरतात, नवी जन्माला येतात.

हेमा: डोक्यात हातोडा मारून एका व्यक्तीला ठार केलं गेलं ! या स्टालिनमुळे ! हुकुमशहा होता तो -- दुष्ट ! आणि तुला काय म्हणायचंय, आपल्याला जखमा होत नाहीत ?

मंदा: पण स्टालिन ध्येयवादी माणूस होता. त्याचे काही चांगले विचार होते. त्यानं केलेली हिंसा ही त्याच्या मानसिक विकृतीचा परिणाम होती. मनोरुग्ण होता तो.

हेमा: काही नाही, वेडबीड काही नव्हतं -- चांगला सुबुध्द, विचारी माणूस होता तो. अगदी थंडपणे -- विचारपूर्वक आपली सत्तापिपासा जोपासण्याची शक्ती होती त्याच्यात.

मंदा: म्हणजे तो शहाणा असून हिंसक होता की वेडा असून त्याचे विचार चांगले होते ? मला वाटतं यातलं काहीच तसं सिध्द होऊ शकणार नाही -- किंवा सिध्द करता आलं तरी सत्य कळू शकणार नाही. कोणत्या गोष्टीवर विश्वास ठेवायची आपली इच्छा आहे त्याच्यावरच सगळं अवलंबून आहे. माझा तरी असा विश्वास आहे की तो एक चांगला आणि शक्तिमान माणूस होता आणि त्याच्या चांगल्या विचारांच्या आड जी जी माणसं आली त्यांची हिंसा झाली.

हेमा: पण ज्या ध्येयाच्या आड इतकी माणसं येतात ते ध्येय बाळगावंच का माणसानं ? माणसांच्या संख्येला काहीच महत्त्व नाही ?

मंदा: ध्येयवादी माणसाला ध्येय महत्त्वाचं असतं. त्या ध्येयाच्या आड येणाऱ्या माणसांची संख्या महत्त्वाची नसते.

हेमा: त्यानं बहुतेक महत्त्वाच्या विभागांचे लष्करप्रमुख ठार केले. सोव्हिएट रशियाचे नव्वद टक्के राजदूत ठार केले. मॅक्सिम गॉर्कीचा खून केला. मायकोवस्कीसारख्या कवींनी त्याच्यामुळे आत्महत्या केल्या. त्याच्या क्रूर कर्मांना कंटाळून खुद्द त्याच्या भयभीत बायकोनं आत्महत्या केली. त्यानं असंख्य ज्यूंची कत्तल केली - छळ केला.

मंदा: पण तरीही जनता त्याच्याविरुध्द खवळून उठली का ? नाही. कारण जनतेला त्याचे विचार आवडत होते. त्याच्या गुणांचं आकर्षण होतं.

हेमा: पण मुख्य म्हणजे त्याच्या शक्तीची भीतीही होती.

मंदा: सगळंच असेल. पण मुख्य काय होतं ते आपण आता ठरवतोय. हे ठरवण्यात मात्र आपली इच्छाच मुख्य आहे.

हेमा: म्हणजे नरेशचं वागणं तुला अजिबात खटकत नाही ? तुझ्या घरची आर्थिक परिस्थिती तितकीशी चांगली नसल्यामुळं तू स्टालिनला दोष देत नाहीस. प्रत्येक गोष्टीशी तडजोड करतेस.

मंदा: आणि तू घरची श्रीमंत आहेस म्हणून माझ्या उलट वागतेस. काही बाबतीत तडजोड केली नाही तर तुझं चालू शकेल.

हेमा: मंदा, प्लीज, असं बोलू नकोस. आपल्या मैत्रीत हे प्रश्न कधीच आले नाहीत. आपल्याला एकमेकींचं प्रेम वाटतं. म्हणून तर मी तुझ्याशी मोकळेपणानं बोलते आहे. मी तुझ्याशी जे काही बोलेन ते तू नरेशला सांगणार नाहीस हा विश्वास आहे मला.

मंदा: कारण तुझा माझ्यावरही विश्वास आहे आणि नरेशवरही विश्वास आहे.

हेमा: तो आपले अपमान करतो. वाटेल ते घाणेरडं बोलून जखमा करतो आणि तरीही आपण त्याचा नाद सोडत नाही.

मंदा: कारण, स्पष्टच बोलायचं म्हणजे, आपण दोघी जरी मैत्रिणी असलो तरी आपलं त्याच्यावर प्रेम आहे.

हेमा: आज आता तो आला की मी त्याच्याशी भांडणार आहे.

मंदा: कशासाठी ?

हेमा: बरं ते राहू दे. मी जसं तुझ्याशी विश्वासानं बोलले तसं तूही माझ्याशी बोललं पाहिजेस. खरं सांग, तूही त्याच्यावर खरंच माझ्यासारखाच विश्वास टाकला आहेस ?

मंदा: मला तुझा प्रश्नच कळला नाही.

हेमा: म्हणजे असं की, स्पष्टच म्हणजे, आम्ही एकत्र झोपलो होतो -- कपडे काढून.

मंदा: मी अजून तरी तसं काही केलेलं नाही.

हेमा: मग हरकत नाही. आणि आता तसं काही करूही नकोस. माझ्यासाठी. कारण मी आधीच त्याच्यावर विश्वास टाकून बसले आहे.

मंदा: आणि समजा मीही असं काही केलं तरी मी त्याच्यावर विश्वास टाकला आहे असं मी म्हणणार नाही.

हेमा: खरंच आहे तुझं. मलासुध्दा अलिकडे असं वाटायला लागलंय की आपण चुकीच्या ठिकाणी विश्वास टाकला. त्याचा भरवसाच वाटत नाही.

मंदा: मी तशा अर्थानं बोलत नव्हते.

हेमा: तू कशाही अर्थानं बोलत असलीस तरी स्टालिनच्या यंत्रणेनंच निवडलेल्या सतराव्या सोव्हिएट कम्युनिस्ट कॉंग्रेसच्या १९६६ प्रतिनिधींपैकी ११०८ प्रतिनिधींचं शिरकाण केलं गेलं हे तरी खोटं नाही ? महायुध्दानंतर व्हीझनेसेन्स्की सारखे उच्चपदस्थ सहकारीही त्याच्या क्रौर्यातून सुटले नाहीत हे तरी खोटं नाही ?

मंदा: असेल. कदाचित स्वभावत:च माणसांना गुणांबरोबरच क्रूरपणाचंही एक सूक्ष्म आकर्षण वाटत असेल. नरेशसुध्दा तसं म्हटलं तर आपला छळच करतो. तरी तो आपल्याला आवडतो की नाही ?

हेमा: तुला तर त्याच्या छळ करण्याच्या वागण्यातल्या पध्दतीच फक्त माहिती आहेत. याहून खूपच जास्त छळ करण्याच्या त्याच्या पध्दती मी प्रत्यक्ष शरीरानं भोगल्या आहेत.

मंदा: बरं मग तुझं म्हणणं काय आहे ?

हेमा: तू माझ्या मार्गातून बाजूला हो. आपण मैत्रिणी आहेत आणि मी त्याच्या जास्त जवळ गेले आहे.

मंदा: मी जरी तुझ्याइतकीच त्याच्या जवळ गेलेली असते तरी मी तुला असं म्हटलं नसतं. मी कुणाच्यातरी मार्गात येते आहे वगैरे हा कुणाचा तरी विचार आहे. माझी आणि नरेशची मैत्री आहे हे खरं आहे, पण मार्गात येणं, मार्गातून बाहेर जाणं या सगळया नंतरच्या गोष्टी आहेत. सगळया वाईट शक्यता निवारून मग वागायला सुरुवात करायची असं कधी होत नसतं.

हेमा: ( एकदोन क्षण निकरानं पाहून ) म्हणजे मग स्टालिनचं वागणं बरोबरच होतं हे मलाही पटेल असं वाटतंय मला .

मंदा: तुझे विचार तू कसेही बदलू शकतेस.

हेमा: पण आता मी ध्येय बदलू शकणार नाही हे लक्षात घे. स्टालिनची मुलगी खुद्द स्वेटलाना त्याच्याबद्दल काय म्हणते हे सुध्दा लक्षात घ्यायची मला आता आवश्यकता वाटत नाही. आणि तुझंसुध्दा काही खरं नाही. त्यानं मारलेल्या लोकांत तुझे वडील किंवा भाऊ असते -- म्हणजे तूच वेगळं बोलली असतीस.

मंदा: तुझा गोंधळ उडालेला आहे आणि तुझं म्हणणं मान्य करायला मी तयार आहे. मी जर तुझ्यासारखी श्रीमंतीत, लाडात वाढलेली असते तर नरेशबद्दल मी वेगळं बोलले असते. पण हेही अगदी बरोबर नाही. कारण परिस्थिती माणूस घडवते हे जितकं खरं आहे तितकंच माणूस परिस्थिती घडवतो हेही खरं आहे. कदाचित ही दोन्हीही सत्यं फारशी महत्त्वाची नसतील.

हेमा: मग या क्षणापासून आपली मैत्री संपली असं समज. पण यापूर्वी आपली मैत्री असताना मी जे तुझ्याशी विश्वासानं बोलले त्याचा तू दुरुपयोग करणार नाहीस अशी आशा आहे.

मंदा: असू दे.

हेमा: म्हणजे विश्वासघात करणार तू ? पण एक लक्षात ठेव, मीही सरळ आहे तोवर सरळ आहे. मलाही दुष्टपणा करता येईल.

मंदा: ठीक आहे.

हेमा: ( जरा वेळ चवताळून पाहून मग संतापून मंदाकडे जात -- झटापट करीत ) ठीक आहे काय...अं...ठीक आहे काय... ठीक आहे म्हणे...ठीक आहे म्हणे...( मंदा ' अगं, अगं ' म्हणत प्रतिकार करते पण हेमा जोरात. मंदाचे केस विस्कटतात, कपडे विस्कटतात, एवढ्यात नरेश येतो. 'अरे,अरे' म्हणत भांडण सोडवतो. हेमा धापा टाकत उभी. मंदा रडायला लागते.)

नरेश: ( मंदाला ) तू कधी आलीस ?

हेमा: ( वेडावत ) त्यू क्यधी lलीश ? म्हणजे ! इतकं पाहिलं त्याबद्दल काहीच नाही --

नरेश: नाही. ते विचारणारच होतो. अगं मैत्रिणी तुम्ही दोघी आणि हे काय ! छे !

हेमा: तू अजून थोडा वेळ आला नसतास तर जीवच घेणार होते मी तिचा --

मंदा: ( किंचाळते ) घ्यून टाक ! मी सरळ वागते, मऊपणानं वागते, कुणाला दुखवत नाही त्याचा फायदा घ्या सगळे ! माझं शेवटी कुणीच नाही.

नरेश: अरे हो हो हो, पण झालं काय ? म्हणजे तू न दुखवताच हेमा इतकी दुखावली गेली म्हणायची !

हेमा: गरीब गाय ती ! आणि मला वेड लागलंय !

नरेश: अगं मग वेड न लागता काय हे वेड्यासारखं, अं ! बरं आता काय, कारण काय होतं ते तरी सांगा.

मंदा: कुठला कोण स्टालिन आणि --

नरेश: स्टालिन ?।।। ( मोठ्यांदा हसतो.) तुमची मतं काहीही असोत, मोठा माणूस होता तो ! अर्थात हेमासारख्या एखाद्या भुक्कड श्रीमंत मुलीला हे पटणार नाही म्हणा -- सॉरी -- च्यायला नाहीतर माझाही जीव धोक्यात यायचा --

हेमा: हेच ते ! गरीबी माणसाचं डोकंही बिघडवते ते असं ! त्याच पायावर एकत्र यायला बघायचं. आपल्यावर खरं प्रेम कुणाचं आहे, आपल्यावर जास्त विश्वास कुणाचा आहे, आपल्यावर जास्त कोण अवलंबून आहे -- काही समजूनच घ्यायचं नाही !

नरेश: अरे पण ही असली तुलना करायचं कारणच काय म्हणतो मी ! इथं काय लग्नाबिग्नाचा प्रश्न निघालाय काय !

हेमा: म्हणजे तो काही प्रश्न नाहीच म्हण की !

नरेश: असला तरी हरकत नाही. तुमची दोघींची लग्नं झाल्यावर आपण तुमच्याशी फक्त शुध्द मैत्री ठेवू -- बास ! आता म्हणजे नाही म्हटलं तरी तुम्ही पोरी आहात हे महत्त्वाचं ठरतंय.

हेमा: हं, पोरी ! तुझ्या समाधानासाठीच जन्माला आलोय आम्ही ! काही वाटत सुध्दा नाही असलं घाणेरडं बोलायला.

नरेश: यात घाणेरडं काय आहे ?आणि दुसरं एक आपलं म्हणजे जाता जाता मी सांगून ठेवतो ! काय ! बोलणं घाणेरडं आहे असं वाटणं, वागणं वाईट आहे असं वाटणं किंवा वागणं अगदी क्रूर वाटणं यावरूनसुध्दा कुठलाही माणूस कधीच आपल्याला कळू शकत नाही. स्टालिननं अमूक लाख लोक मारले वगैरे या घटना झाल्या. आणि त्यांची माहिती देणारी ही वाक्यं झाली ! प्रत्यक्ष स्टालिन कसा होता हे एक त्या स्टालिनलाच माहीत ! हेही सगळं शांत समंजसपणानं होऊ शकतं -- विनाशसुध्दा निर्मितीरूप असू शकतो. असो. हे एक महत्त्वाचं सार मी आज तुम्हा दोघींना सांगितल्याबद्दल तुम्ही मला काय देणार ? दोघींकडूनही घ्यायची आपली तयारी आहे.

हेमा: हं ! ( मंदा नुसती उभी ).

नरेश: लावू दाराला कडी -- आतून ? राहू द्या. तुमचा दोघींचाही आपल्यावर विश्वास दिसत नाही. निदान आत्ता तरी ! आपलंही काही अडलेलं नाही ! दुसऱ्या आहेत -- विश्वास टाकणाऱ्या !

हेमा: ( संतापून ) घे -- तुला काय हवं ते घे ! लाव कडी ! लाव ! जा की !

मंदा: मी जाते.

नरेश: कशाला मंदा मोठा सभ्यपणाचा बुरखा घेतेयस ? हेमा मैत्रीणच आहे तुझी -- आपलं माझी !

हेमा: म्हणजे ?

मंदा: ( जोरात ) म्हणजे काही नाही. कुणाचा किती विश्वास आहे ते माहीत आहे त्याला !

नरेश: बरं, आपण आता एक करू. पुढील समरप्रसंग टाळण्यासाठी वैयक्तिक काहीही बोलायचं नाही. कारण शेवटी बोलण्यातून कळणाऱ्या गोष्टीही अर्धवटच असतात आणि त्यामुळं गैरसमज वाढतात.

हेमा: नाही नाही. असं चालणार नाही. ही नुसती मैत्रीण म्हणते मला, पण हिनं माझ्यापासून काही गोष्टी लपवून ठेवल्यायत हे आता लक्षात आलंय माझ्या. आता या क्षणी प्रत्येकानं आपापले अनुभव स्पष्टपणे सांगितले पाहिजेत. आपण एकमेकांना कसं समजून घेतो हे कळलंच पाहिजे. निदान तुला तरी खरं आणि स्पष्ट बोलावंच लागेल. हे असं अधांतरी फार काळ सहन होणार नाही.

नरेश: च् च् च् ! अगं इतका वेळ काय सांगतोय मी ? स्पष्ट आणि खरं असं नसतंच काही. कुणीही कितीही बोललं तरी काहीही कळू शकत नाही. कधी कळणार हे तुला !

हेमा: हे ढोंगी बोलणं बास झालं ! तुझी संघर्षसमिती काय काही न कळताच चालवतोस तू ? काहीच विचार नसतात ?

नरेश: हं -- ते सांगतो. आम्ही कुठलंही ध्येय किंवा तत्त्वप्रणाली मानत नाही. त्या त्या वेळी योग्य वाटेल ते आम्ही करतो. मागची तत्त्वं सोडायची नाहीत आणि नवी तत्त्वं वापरायची नाहीत असं काहीही बंधन नाही आमच्यावर.

मंदा: पण नरेश मला असं वाटतं की, तू लोकांच्या आयुष्याशी खेळतोयस असं वाटण्यासारखं तुझं वागणं आहे. हे थांबलं पाहिजे.

नरेश: हे बघा, तुम्हाला दोघींनाही जर असं वाटत असेल तर तुम्ही निघून जाऊ शकता, आणि पुन्हा आपण भेटायचीही आवश्यकता नाही.

मंदा: हे तुझं बोलणं क्रूरपणाचं आहे. माझ्या बोलण्याचा उद्देश न समजून घेता बोलतोयस तू. आपल्यातले संबंध ठळक, स्पष्ट करत जाऊन त्या संबंधांची शक्ती मिळवलीयस तू ! आणि तुझी बेफिकिरी म्हणजे ती शक्ती वापरण्याचा एक प्रकार आहे.

हेमा: स्टालिनच आहेस तू !

नरेश: अगं, कुठं स्टालिन, कुठं मी ! आपण काय बोलावं त्याच्याबद्दल ! आणि एवढी सगळी दुनिया सोडून हाच एक माणूस का एवढा रुतून बसलाय आपल्या डोक्यात ! बायका सगळे प्रसंग आणि सगळी संभाषणं हास्यास्पद करतात ते असं !

हेमा: म्हणजे हे विचार तुझे बायकांबद्दल !

नरेश: खुळी आहेस. हे माझे संपूर्ण बायकांबद्दलचे विचार नव्हेत. त्यांच्या एका भागाबद्दलचे आहेत. आणि हेही विचार कायम बाळगायची माझ्यावर जबाबदारी नाही.

मंदा: म्हणजे तुला कसल्याच बदलाची आवश्यकता वाटत नाही तर !

नरेश: ( चिडून ओरडतो ) नाही,नाही,नाही. माझ्या वागण्याचे निश्चित अर्थ लावायचा आग्रह का तुमचा ! का म्हणून तुम्ही ते चांगलं किंवा वाईट ठरवणार ? कोण तुम्ही ? माझ्या भोवती सगळी माणसं अशी का जमताय तुम्ही ! शेवटी मी एकटाच आहे -- माहीत आहे मला -- ( उद्विग्नपणे बसून राहतो. काही क्षण. हेमा आणि मंदा एकमेकींकडे पाहतात. मग त्याच्याकडे पाहतात. ) मी प्रेम करतो तुमच्यावर हेच चुकतंय माझं --( हेमा हळूहळू पुढे येऊन त्याच्या खांद्यावर हात ठेवते.मंदा आहे तिथे उभी.)

हेमा: तुझं प्रेम मला कळत नाही असं वाटतं का तुला ? पण शेवटी निवड करावीच लागणार की नाही तुला -- म्हणजे कुणाच्या तरी बाबतीत हा खेळच ठरणार की नाही --

नरेश: ( उव्देगानं ) मी निवडी - बिवडीचा विचार केलेला नाही. पुढल्या दहा वर्षांचे विचार करून वागता येत नाही मला. माफ करा मला. आपल्या संबंधांत तुमच्या बाजूनं असुरक्षिततेची भीती आहे, हे माहीत नव्हतं मला.

हेमा: अरे पण समाजाच्या सध्याच्या चौकटीत मुलीच्या मनात ही भीती असणं तरी चूक आहे का ? दुसऱ्यांना समजून का घेत नाहीस तू ?

नरेश: मला स्वत:ला समजून घ्यायला अजून जमलेलं नाही मला. दुसऱ्यांना -- ( मान झटकतो.)

मंदा: ( मान खाली घालून ) मी बोलायला नको होतं तुला. क्षमा कर मला.

नरेश: नाही, नाही, तुमची काही चूक नाहीय. तुमची काही चूक नाहीय.( काही क्षण शांतता. अत्यंत धिम्या शांत आवाजात.) मी -- मी तयार आहे. तुमचं म्हणणं मान्य आहे मला. तुम्ही म्हणाल तसा बदलायला तयार आहे मी. तुम्हा दोघींवरही माझं प्रेम आहे. मला निवड करता येणार नाही. कुणाला तरी कायमचा साथीदार महणून निवडणं स्वभावातच नाही माझ्या. म्हणूनच एकटा आहे मी. म्हणूनच एकटा आहे.( हेमा आणि मंदा दोघीही याचकपणे एकमेकींकडे पाहतात. मंदा नजर वळवून खाली पाहते.)

हेमा: म्हणजे तू काही आपली साथीदार वगैरे निवडण्याची शक्यता नाही हे सध्या तरी आम्ही गृहीत धरावं असं दिसतंय. म्हणजे तुझी मैत्री हा पुढं आमचा भूतकाळ म्हणून प्रसिध्द व्हायचा धोका पत्करून हे म्हणजे आमची तयारी असायला पाहिजे. पण आमच्यात एवढी शक्ती आहे का याचाही तू विचार करायला नकोस का ?

नरेश: ( अत्यंत समजुतदारपणे ) हेमा, हा विचार मी कसा करणार ? आणि माझा कोणताही आग्रह नाही.

हेमा: पण तुझा सहवास तोडण्यात एखाद्या व्यक्तीच्या भावना दुखावल्या जात असतील तर तिनं काय करावं ? म्हणजे मार्ग नाहीच का यातून ?

मंदा: मी माघार घ्यायला तयार आहे. तू हेमाशी एकनिष्ठ राहा.

नरेश: असल्या मार्गानं मात्र मला दु:ख होईल. एका व्यक्तीनं त्याग करायचा आणि आपल्या सुखासाठी दुसऱ्या व्यक्तीनं त्याचा फायदा घ्यायचा आणि अशा स्वार्थी व्यक्तीशी मी एकनिष्ठ राह्यचं हे मला जमणार नाही. आतून कायम धगधगत राहीन मी.

हेमा: म्हणजे मला तू स्वार्थी म्हणतोयस. पण मंदाच्या त्यागावर जगायची माझी इच्छाच नाही. म्हणून तर मी म्हणतेय की हे तूच ठरवायला हवंस.

नरेश: एक तर असा निर्णय घेऊन निवड करणं माझ्या स्वभावात नाही आणि तरी समजा मी हे केलं तर मी निवडलेल्या व्यक्तीला आपण यशस्वी झालो असं वाटेल आणि मी न निवडलेल्या व्यक्तीच्या मनात माझ्याबद्दल गैरसमज राहतील आणि मी ज्या व्यक्तींवर इतकं जवळून प्रेम करतो त्यांच्यात या दोन्हीही गोष्टी घडणं मला त्रासदायक होईल.

मंदा: आपले तिघांचेही विचार वेगवेगळया पध्दतींनी जाताहेत आणि नाती तर आपल्याला हवी आहेत.

हेमा: मी श्रीमंत आईबापांच्या पोटी जन्माला आले आणि लाडात वाढले हेच माझं दुर्दैव आहे. आणि त्यामुळं मी जास्त अहंकारी आणि अप्पलपोटी झाले आहे. माझ्या स्वभावातले हे दोष दुसऱ्याला तिरस्कार वाटण्यासारखेच आहेत.

नरेश: पण कुणाचं तरी वर्चस्व तुलाही चालतं.

मंदा: आणि माझा घरचा प्रश्न वेगळाच आहे. वडिलांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. माझी तुझ्याशी मैत्री आहे हे त्यांना माहीत आहे. परस्पर जमून गेलं तर बरं झालं असा त्यांच्या मनातला विचार अगदी जाणवण्याइतका स्पष्ट दिसतो. घृणा वाटते मला गरिबीची. असं वाटतं की आपण नुसतीच मैत्री ठेवावी. लग्न करूच नये कधी. मुद्दाम वेडंवाकडं वागून सूड घ्यावा गरिबीवर.

नरेश: ( काही क्षणांनी ) आपण आपल्या आयुष्यांना फार महत्त्व देतो.( काही क्षण शांतता ) चांगलं म्हणजे काय आणि आपल्या निर्णयाचे आणि वागण्याचे चांगलेच परिणाम दिसले पाहिजेत म्हणजे तरी काय हे कधीच कळणार नाही आपल्याला -- कधीच कळणार नाही. आपलाच हा प्रश्न... हा प्रश्न सोडवायचा आपण कोणत्याही दिशेनं प्रयत्न केला तरी त्यातून संघर्ष आणि विध्वंस यांचीच निर्मिती होईल... कुठलाही प्रश्न सोडवायचा प्रयत्न न करता जगता आलं पाहिजे...ज्यांनी ज्यांनी प्रश्न सोडवायचे निर्धार केले आणि तसे निष्ठुर प्रयत्न केले ते सगळे क्रूरकर्मा झाले... पण त्यांच्या प्रयत्नांतून कुणीतरी सुखीही झालं असेल... की कुणीच सुखी झालं नसेल ?...( आता प्रकाश अस्थिर होतो. डजस्टमेंट करता करता एखाद्या ॲब्नॉर्मल लेव्हलवर स्थिर होतो. त्यातच झटकन् दुसऱ्या एखाद्या रंगाची तिरीप मिसळते. तिघेही दारू पीत बसले आहेत. काही क्षण असे जातात. मग नरेश किंचित हसतो.)

हेमा: का ? ...हसलास का ?

नरेश: ( पुन्हा किंचित हसून ) मला...असं वाटलं की आपण नाच करावा..

मंदा: अं ?

नरेश: ( मंदाला ) ये, तू ये ...( तिला उभी करतो. तिला घेऊन नाचायला पाहतो पण तिला जास्त चढलेली आहे.) नको...थांब...बस...तू बस...त...तोल जातोय तुझा...तू बस...( तिला बसवतो. हेमाला घेत...) तू...तू ये...( हेमा उठते. नाचायला सुरुवात करतात. हेमाला हळूहळू हसू येत जातं. हसायला लागते. नाच संपेपर्यंत हसतच राहते. मंदा स्वस्थ बसलेली. नाच संपल्यावर हेमा हसतच येऊन बसते.)

नरेश: मजा आली...मजा आली...मजा आली...

हेमा: मी काय म्हणते की मंदाला इतकी जास्त चढत होती... म्हणजेच ती अशक्त होती...नरेशला हेमाच योग्य होती...खरं म्हणजे प्रश्न नव्हताच त्यात...मोठासा...

मंदा: अं ? ... अं ?

हेमा: अगं, अं अं काय करतीयस...अं ?

नरेश: नाही...( हेमाला ) मला तू एक सांग... काय मार्ग निघू शकला असता...अं ? क...कोणता मार्ग होता...

हेमा: हेमा श्रीमंत होती की नाही...तिनं आपल्या वडिलांमार्फत जमवायचं... त्यांना मंदाच्या वडिलांशी दोस्ती जमवायला सांगून...तिच्या वडिलांना तिच्या लग्नासाठी पैसे द्यायचे... आपोआप काटा निघाला असता...

नरेश: नाही -- हे नाही--हे--हा दुष्टपणा झाला...दुसरं सांग...

हेमा: हेमाचं एक चुकलं...ती नाही म्हटलं तरी आपलं शरीर जपतच होती...फक्त एकदाच तिनं नरेशला हातचं राखून शरीर दिलं होतं...तिनं...तिनं... त्याला आपल्या शरीराची सवय लावायला हवी होती...व...व्यसन लावायला हवं होतं...

नरेश: नाही नाही नाही नाही... हे तर मंदाही करू शकली असती...

हेमा: तुला जर क--काहीच पटत नसेल त--तर

नरेश: हं सांग सांग --

हेमा: नरेशनं त्या दोघींना कळेल अशा पध्दतीनं वेश्येकडं जायचं --- असं केलं असतं नं तर त्या दुखावल्या गेल्या असत्या आणि आपोआप लांब गेल्या असत्या... आधुनिक असलं तरी पझेसिव्ह असतंच ना माणूस...

नरेश: हां !!!... हे एक आहे...पण तसं नसतं झालं...उलट त्या खट्टू झाल्या असत्या...काय...खट्टू ! ...आणि मग त्यांनी आपली शरीरंसुध्दा देऊन त्याला रोखलं असतं...

हेमा: ढुंगणांवर लाथा मारून हाकलून द्यायचंन् मग त्यानं...दोघींनाही...

नरेश: चेष्टा करतेयस तू...चेष्टा करतेयस...

हेमा: अरे नाही बाबा...चेष्टा नाही करत...

नरेश: मंदा...तू सांग...दुसरं काहीतरी सांग...

हेमा: मंदानं..म..मरून जायला पायजे होतं...

नरेश: मरून ? ह्यॅ ! म्हणजे बापावर गरिबीचा कायमचा अपराध आणि समज माझ्यावर त्याग करायला लावल्याचा गुन्हा... म्हणजे सुखानं कुणीच जगू नये असं झालं हे...हे...हे नाही पटत.

हेमा: पण त्यांचा प्रश्न तर सुटलाच पाहिजे रे बाबा...

नरेश: नरेशचं एक चुकलं... आपल्याला भावनेनं कुणीकुणी बांधलं जावं असं होऊच द्यायला नको होतं त्यानं...आणि तो स्वत:ही गुंतला होता...

हेमा: असं न होता आयुष्य एकलकोंडं वाटणार नाही ? ( मंदाला अचानक रडू फुटतं. हुंदके देऊ लागते.)

नरेश: ए, काय झालं तुला ? ... काय झालं ? ... ए सांग...काय झालं ?

मंदा: सगळयांना त्रास होतो माझा...घरात माझ्यामुळं प्रश्न तयार होतात...काळजी वाटते सगळयांना...वादावादी होते...बाहेर तेच...माझं धड काहीच होत नाही...मारून टाका मला...मारून टाका.

हेमा: एखाद्या मराठी नाटकातल्या टिपिकल पात्रासारखं बोलतेय ही...ए बाई... आम्ही काही तिकीट काढून आलेलो नाही इथे...

नरेश: ( मंदाला ) ए... असं काय करतेस...अं...ए...

मंदा: ही -- ही खून करायला घाबरते आहे माझा...खून करेल ही...ही खून करायला घाबरते म्हणून मी जिवंत आहे...खूप लोकांना ठार करू शकेल ही...तुला... सुध्दा...

नरेश: मंदा...तू आता पिऊ नकोस...पिऊ नकोस तू ...( तिच्या हातातला ग्लास काढून घेऊन स्वत: घटाघट पिऊन टाकतो. मग हेमाच्या हातातला ग्लास घेतो...)

हेमा: अरे पण मला कुठं जास्त झालीय ?

नरेश: ( तोही ग्लास पिऊन ) नको...बास झालं आता...बास झालं...त्या दोघींनी खरं तर लग्नबिग्न डोक्यात न घेता नरेशबरोबर राहायला काय हरकत होती ? अं ? काय हरकत होती ? इतका सोपा मार्ग दिसत नव्हता त्यांना तर हे असंच होणार...असंच होणार हे ...

हेमा: नरेशला आपण स्वार्थी असू नये असे वाटत होतं...पण तोही स्वार्थी होता...तोही ...स्टालिनला सुध्दा बहुतेक कुठले तरी प्रश्न सोडवायची इच्छा झाली असेल...असेलही...पण आपल्या हातून प्रश्न सुटावेत ही एवढी प्रचंड जबाबदारी घ्यायचा अहंकार हवाय कशाला ?

नरेश: अहंकारी नव्हता तो...उलट साधा होता...साधा होता...

हेमा: इतके लाखो लोक ---( मंदा तोल सावरत, धडपडत उठते ---) काय करतीय ही ?

नरेश: ( तिला हात देत ) ए मंदा...मंदा...( प्रकाश झटाझट बदलत पूर्ववत होतो. दारूचे दृश्य झालेच नाही असे सगळे नॉर्मल...) कुठे निघालीस ?

मंदा: जाते मी. पराभव स्वीकारणं हा धर्मच आहे माझा. कर्तव्यच आहे ते माझं.

नरेश: नाही मंदा, असं म्हणू नकोस... तुझ्या मनातली ही परिस्थितीची बोच जावी यासाठी वाटेल तो प्रयत्न करायला मी तयार आहे...

मंदा: ती कधीच जाणार नाही --( त्याचा हात बाजूला करते आणि निघून जाते. काही क्षण नरेश तसाच उभा. हेमा स्तब्ध...)

नरेश: हेमा, आपली दोघांचीही ही मैत्रीण...पण...काहीच करू शकत नाही आपण...

हेमा: या समान दु:खाच्या पायावर एकत्र येऊ या आपण. नंतर घरात फोटो लावू आपण तिचा...

नरेश: ( किंचाळतो ) काय !!! प्रेताच्या टाळूवरचं लोणी खाणारी जात आहे तुझी ---

हेमा: ( थंडपणे ) मग ती कशाला सारखी स्वत:च्या आर्थिक परिस्थितीचा असा वापर करते ? दुसऱ्यांची आयुष्यं कशाला गढूळ करत राहते ? तिचा क्रूरपणा दिसत नाही वाटतं तुला ?

नरेश: बरं हे विचार आणि मतं थांबवू या आपण -- काही उपयोग नाही त्याचा...मला जरा आता शांत बसायची इच्छा आहे.

हेमा: ठीक आहे.( उठत ) बराच उशीरही झालाय. जाते मी.( अंग ताणते. कपडे नीट करते.) तू जा असं म्हणण्यापूर्वीच आपणहून गेलेलं बरं.

नरेश: हं --( शांतता. ती निघते. तो उभा.)

हेमा: ( शांतता भंग न करता ) बरं--मग --( नरेश उभ्या उभ्या पाहतो ) नाही -- काही नाही -- ( जाते. काही क्षण नरेश उभा. मग हळूहळू येऊन बसतो. काही क्षण रिकामे. मग त्याच्याच आवाजात ' आता क्रांतीचं महत्त्व तुमच्या लक्षात आलं असेल ' हे वाक्य एकाच लयीत वाजत राहतं. हळूहळू अस्पष्ट होत जातं. काही क्षण.)

नरेश: हे शहर मी कधी वसवलं ते आता निश्चित सांगता येणार नाही. सुरुवातीला खूप छोटं होतं ते...नंतर कल्पनेपेक्षा खूपच वाढलं ते...! इतकं की आता हे संपूर्ण शहर मीच वसवलं का याची शंका वाटते. आणि आता तर...आता तर गोंधळ इतका वाढला आहे की काहीच करू नये...नुसतं शांत बसावं...नुसतंच...पण आत्मविश्वासच असा घट्ट...की हे होत नाही... विचार चालूच राहतो...विचार चालूच राहतो. आकाशातून एखाद्या ग्रहाचा तुकडा फुटून येऊन पृथ्वीवर आदळल्याशिवाय हे संपणारच नाही असं वाटत राहतं...सतत म्हणजे तात्पुरते कामचलाऊ मार्ग स्वीकारावेच लागणार मला...निवड करावीच लागणार... छळ होतील, आत्महत्या होतील...खून होतील...रक्ताच्या सड्यांनी धरती...की धरतीमाता...लाल होईल...मी...मी जबाबदार आहे याला ? मानवी रक्त काय फक्त मी ? माझ्याच शरीरातून वाहतंय ?... आमच्या रक्तातच क्रौर्य आहे...हिंसा आहे...मी क्रूर आहे...क्रूर आहे...मी...हेमाचा श्रीमंत देह मला हवा आहे...मंदाचा शरण देह मला हवा आहे... त्यांचे प्रश्न त्यांनी पाहावे... मी स्वतंत्र राहणार आहे. स्वतंत्र ...दोघीही आहेत... माझ्या जाळयात...दोघीही आहेत माझ्या जाळयात ...स्वतंत्रपणेच त्यांनी माझं जाळं निवडलं आहे...आता मी माघार घेणार नाही...मी नाही माघार घेणार... प्रश्न बरोबर घेऊनच जर वाट चालायची आहे तर पावलं खंबीर का नकोत ? हुकुमशहा झाल्याशिवाय गत्यंतरच नाही...हुकुमशाहीशिवाय जगणंच अशक्य आहे...यच्चयावत स्त्रिया पदर पसरून उभ्या आहेत...आणि मला दिसताहेत त्यांचे थरथरते ओठ...स्तन...आणि मांड्या...जगातल्या सगळया संघर्षाची जबाबदारी माझ्याही डोक्यातल्या तप्त ताणांवर आहे... असेलच...असंख्य धर्मांचे स्पर्श होऊनही आम्ही आमची वारुळं उद्ध्वस्त होऊ दिलेली नाहीत...आम्ही तेजस्वी आहोत... आम्ही चपळ आहेत...आम्ही दंश करू शकतो...स्वत:ला आणि इतरांना...चावून चावून आम्ही आमची

आयुष्यं विषारी करून घेतली आहेत...हिरवीचार...मुसमुसती..संघर्षमय...याला अंत नाही... प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न न करता शांत राहून जगू न शकणाऱ्या माणसांपैकीच मी एक आहे...( काही क्षण तसाच...हेमा येते. काही क्षण त्याचे लक्ष नाही. ती दाराला कडी लावून पुढे येते. तो पाहतो.)

हेमा: मी आले आहे.

नरेश: अं ?...तू ? ...

हेमा: मंदानं तुझ्यावर माझ्याहून जास्त विश्वास टाकला...निदान असं तुला वाटण्यासारखं काहीतरी घडलेलं आहे असं मला वाटतं...माझीही तयारी आहे...मीही सगळे विचार टाकून द्यायला तयार आहे...

नरेश: म्हणजे ?

हेमा: म्हणजे इतकंच...आपल्याही संबंधात यापुढे कपड्यांचे पडदे राहणार नाहीत...

नरेश: पण आत्ता...आत्ता मी थकलो आहे...मला...

हेमा: असू दे...तुझा थकवाही मी घालवू शकते...

( कपडे काढायला सुरुवात करते. नरेश पाहात उभा...)

...पडदा पडत जातो...

--- ००० ---

सूचना : सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.

पत्ता -चं.प्र.देशपांडे,

३, स्नेहदीप अपा.

चिंतामणीनगर,

सहकारनगर नं.२, पर्वती,

पुणे - ४११ ००९.

दूरध्वनी - २४२२ ७८४७ / ४८ आणि मो -- ९३७१००५७७३.